
दैनिक
# विवेक सिंधु

बीड जिल्हा | शनिवार, दि.21 मार्च 2026 | viveksindhu@gmail.com | वर्ष 45 वे | अंक क्र.299 | पाने 4 | किंमत : 2 रु. | www. viveksindhu.com




## मानवी वस्तीत शिरणारा बिबट्या आता 'नरभक्षक' श्रेणीत; स्वसंरक्षणार्थ मारल्यास कारवाई नाही

### » वन्यजीव कायद्यात ऐतिहासिक सुधारणा मंजूर





मुंबई: राज्यातील वाढता मानव–बिबट्या संघर्ष संपवण्यासाठी महाराष्ट्र विधानसभा बुधवारी एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला असून वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ मध्ये ऐतिहासिक सुधारणा मंजूर केली आहे. वनमंत्री गणेश नाईक यांनी मांडलेल्या या दुरुस्तीनुसार, आता मानवी वस्तीत प्रवेश करणाऱ्या बिबट्यांना थेट 'नरभक्षक' घोषित केले जाणार असून अशा वेळी स्वसंरक्षणार्थ बिबट्याला मारल्यास संबंधित नागरिकांवर कोणतीही कायदेशीर कारवाई केली जाणार नाही. बिबट्यांची वाढती संख्या आणि त्यांच्यामुळे ग्रामीण भागात निर्माण झालेली दहशतीची परिस्थिती पाहता, वन्यप्राण्यांचे व्यवस्थापन करण्याचे अधिकार आता थेट राज्याच्या मुख्य वन्यजीव रक्षकांना देण्यात आले आहेत.

या नव्या दुरुस्तीमुळे बिबट्यांचा समावेश आता पहिल्या सूचीमधून काढून दुसऱ्या सूचीमध्ये करण्यात आला आहे. यामुळे बिबट्यांना जेरबंद करणे, त्यांचे स्थलांतर करणे किंवा त्यांच्या संख्येचे व्यवस्थापन करण्यासाठी राज्य सरकारला आता वारंवार केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवण्याची किंवा परवानगी घेण्याची गरज उरणार नाही. राज्याचे मुख्य वन्यजीव रक्षक

▸ पान 3 वर

## तात्काळ राजीनामा द्या, मुख्यमंत्र्यांचे रुपाली चाकणकरांना आदेश



मुंबई : अशोक खरात प्रकरणी आता मोठी कारवाई होत असून रुपाली चाकणकरांनी राजीनामा द्यावा असा आदेश मुख्यमंत्र्यांनी दिल्याची माहिती आहे. अशोक खरात प्रकरणात रुपाली चाकणकरांवर आरोप झाल्यानंतर त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली. त्यावेळी झालेल्या चर्चेनंतर रुपाली चाकणकरांनी तात्काळ राजीनामा द्यावा असा आदेश मुख्यमंत्र्यांनी दिल्याची माहिती सूत्रांनी दिली.

शेकडो महिलांच्या लैंगिक शोषणाचा आरोप असलेला भोंदूबाबा अशोक खरात सोबत रुपाली चाकणकरांचे फोटो आणि व्हिडीओ व्हायरल झाले होते. त्यानंतर चाकणकरांवर टीकेचा भडीमार झाला होता. विविध स्तरातून त्यांच्या राजीनाम्याची मागणी होत होती. राजीनाम्यासाठी दबाव वाढल्यानंतर रुपाली चाकणकरांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली आणि त्यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर मुख्यमंत्र्यानी रुपाली चाकणकरांना तात्काळ राजीनामा द्यावा असा आदेश दिल्याची माहिती आहे. त्यामुळे अशोक खरात प्रकरणात आता रुपाली चाकणकरांचा राजीनामा होणार हे जवळपास निश्चित झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया आणि ठाकरेंच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी पत्रकार परिषद घेत रुपाली चाकणकरांचा राजीनामा मागितला होता. रुपाली चाकणकरांनी आधी राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांची भेट घेतली.

▸ पान 3 वर

## कर्जनी गावात प्रशासनाविरुद्ध एल्गार : 50 वर्षांपासूनची घरे पाडण्याच्या नोटिशीमुळे ग्रामस्थ आक्रमक

### » तलावाचा सांडवा फोडण्याचा इशारा



बीड – बीड जिल्ह्यातील कर्जनी गावात गेल्या पन्नास वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या ग्रामस्थांच्या घरांवर वन विभागाने कारवाईचा बडगा उगारल्याने परिसरात सध्या प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. पुनर्वसनाच्या नावाखाली हक्काच्या जमिनी दिल्यानंतर गायरान जमिनीवर स्थायिक झालेल्या नागरिकांना आता वन विभागाने घरे रिकामी करण्याच्या सूचना दिल्या असून, या अन्यायाविरोधात शिवसेना आणि गुजर समाजाने अत्यंत आक्रमक पवित्रा घेतला आहे. जर प्रशासनाने बळाचा वापर करून गरिबांची घरे पाडली, तर धरणाचा सांडवा फोडून तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा गंभीर इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. या संघर्षाची मुळे ५५ वर्षांपूर्वीच्या धरण प्रकल्पात दडलेली आहेत. शासनाने तलाव बांधकामासाठी ग्रामस्थांच्या जमिनी अधिग्रहित केल्यानंतर त्यांचे पुनर्वसन करण्यात आले होते. त्यावेळी प्रशासनानेच ग्रामस्थांना गायरान जमिनीवर घरे बांधण्यास सांगितले होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत डोंगराचा भाग

▸ पान 3 वर

## काशीदवाडी येथे एकाचे डोके फोडले

केज – काशीदवाडी (ता. केज) येथील महादेव जयद्रथ जाधवर (वय ४०) हे १८ मार्च रोजी रात्री ९.३० ते १० वाजेच्या दरम्यान घरी असताना गावातील अशोक भगवान जाधवर, सुमित अशोक जाधवर, दादा वचिष्ठ जाधवर हे आले. त्यांनी तुझ्या मुलाने दुकानासमोर दुचाकीचे हॉर्न का वाजविले असे कारण काढून शिवीगाळ केली. त्यांना शिवीगाळ करू नका म्हणाले असता त्यांनी लाथाबुक्याने मारहाण केली. त्यानंतर दादा व सुमित या दोघांनी महादेव यांना धरले, तर अशोक याने लोखंडी रॉड डोक्यात मारून डोके फोडले. जीवे मारण्याची धमकी दिली. अशी तक्रार अशोक जाधवर यांनी दिल्यावरून अशोक जाधवर, सुमित जाधवर, दादा जाधवर या तिघांविरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. तपास जमादार हनुमान मुंडे हे करीत आहेत.

## सिंचनातील भ्रष्टाचार शेतकरी आत्महत्येला जबाबदार


### अंबाजोगाईत सरिता कौशिक यांचे परखड प्रतिपादन तर जातीपाती विसरुन एकत्र येण्याचे बच्चू कडू यांचे आवाहन



अंबाजोगाई: सिंचन योजनांमध्ये राजकीय प्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी संगनमताने केलेला भ्रष्टाचारच राज्यातील शेतकरी आत्महत्यांच्या सत्राला मुख्यत्वे जबाबदार असल्याचे परखड मत 'एबीपी माझा'च्या कार्यकारी संपादिका सरिता कौशिक यांनी व्यक्त केले. अंबाजोगाई येथे १९ मार्च रोजी किसान पुत्र आंदोलन आणि शेतकरी संघटनेच्या वतीने आयोजित 'शेतकरी सहवेदना' दिनानिमित्त त्या बोलत होत्या. या कार्यक्रमात शेतकरी आणि कष्टकऱ्यांचे नेते माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांना 'राज्यस्तरीय शेतकरी सहवेदना पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. सिंचन प्रकल्पातील भ्रष्टाचाराचा प्रत्येक पैसा एका शेतकऱ्याच्या मृत्यूला कारणीभूत ठरत असल्याची घणाघाती टीका यावेळी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या सरिता कौशिक यांनी आपल्या विस्तृत भाषणात शेतकरी आत्महत्या हा अत्यंत संवेदनशील विषय असल्याचे नमूद केले. गेल्या ४० वर्षांपासून मराठवाडा आणि विदर्भात राबवण्यात आलेल्या सिंचन योजना प्रभावीपणे राबवल्या गेल्या असत्या, तर आज शेतकऱ्यांवर ही वेळ आली नसती, असे त्या म्हणाल्या. अनेक योजना केवळ कागदावरच

▸ पान 2 वर




## बलात्काराची पाठराखण करण्यासाठी महिला आयोग ? : माकपचा सवाल


### विवादित महिला आयोगाच्या अध्यक्षाप्रश्नी सत्ताधारी मुकगिळून गप्प




बीड – महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी राज्य असल्याचा वलग्ना करणारे सत्ताधारी हेच अंधश्रद्धेला खतपाणी घालण्याचे काम करत असल्याची शंका नव्हे तर विश्वास सर्वसामान्य जनतेच्या मनात निर्माण झाला आहे. राज्य महिला आयोग महिलांचे शोषण रोखण्यासाठी की, लाडक्या बहिणींवर बलात्कार करणारांची पाठराखण करण्यासाठी ?असा प्रश्न निर्माण झाला असून राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षाच्या भोंदू तांत्रिक बाबा खरात सोबतचे व्हिडीओ समाज माध्यमातून, वृत्तवाहिन्या मधून जनसामन्यात पसरत असताना धर्मांध सत्ताधारी मात्र या प्रश्नी मूकगिळून बघायची भुमीका घेत आहे.अंधश्रद्धेत लिप्त राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपालीबाई चाकणकर यांच्या तात्काळ राजीनामा घेऊन त्याची हकालपट्टी करावी यासाठी जनवादी महिला संघटना व बीड मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने शुक्रवार दि 20 रोजी धारूर तहसील कार्यालयासमोर निदर्शने केली.

शिव शाहू फुले

▸ पान 3 वर



# २१ मार्च जागतिक वन दिन

माझा जन्म ग्रामीण भाग ज्या भागात लहानपणापासून जल जमीन जंगल याविषयी अंतरिक जीवन निर्माण झाला. बाळकडूच नदी, पर्वत, डोंगर, वृक्षांच्या सानिध्यात गेले. तेव्हापासून नदीला पाणी ,मातीत रमने वृक्षाची बोलणे झऱ्याचे पाणी डोक्यावर आणणे, आड विहिरी बारव या ठिकाणाहून पोहरे आणि पाणी शेंदण. त्यासाठी लहानपणापासूनच पावसाचा प्रत्येक थेंब वाचण्यासाठी श्रमाची किंमत पाण्याची किंमत त्यामुळे त्याचे नियोजन या सर्व गोष्टींचा सहवासात असल्यामुळे. ज्या ठिकाणी शिकायला होतो ते देवळा. त्या गावात कुंडलिका नदी व जे गाव त्या ठिकाणी दोन्ही बाजूला नदी मध्ये बेटासारखे गाव. शिवराई वडील शेतकरी असल्यामुळे मातीचा लळा. कुस्ती खेळ असल्यामुळे मातीत रमणे मातीत खेळणे. लहानपणापासूनच हे सर्व पाहत मोठा झालो. त्यामुळे लहानपणीच निसर्ग संवेदना जागृत झाले. निसर्गाशी नाळ जोडली गेली. निसर्गाच्या सानिध्यात राहणे, झोपणे, उठणे, बसणे त्यामुळे पक्षी फुलपाखरे यांचा सहवास व निसर्गाच्या सानिध्यात राहिल्यामुळे ऑक्सिजनचा पुरवठा त्यामुळे शरीर संपदा. निसर्गतः प्राप्त डोंगरदऱ्यात बालपण खेळले गेले हे सर्व व्यवस्थित चालू होते.

माझी पिढी निसर्गाशी एकरूप झालेली. पण साधारणतः १९७२ च्या दुष्काळापासून या निसर्गाला दृष्ट लागली ज्या डोंगरावर मोठमोठे जंगली होती. ती हळूहळू ओस पडू लागली. लोक जंगल तोडू लागली. जमिनीच्या दुष्काळात ६० ते ८० फुटावर पाणी लागायचे. फक्त धान्याचा दुष्काळ होता. त्या काळात आम्ही फळ कंदमुळे सुकडी यावर दिवस काढले. पुढे हरितक्रांती झाली लोकसंख्या वाढ झाली. तेव्हा पाणी जमिनीच्या पोटातून कडू लागली सिमेंटची जंगल हळूहळू तयार होऊ लागली. जाळण्यासाठी लोक मोठी वृक्षतोड होऊ लागली. पृथ्वीच्या पडून पाण्याचा उत्साह होऊ लागला. मानव निसर्गावर हल्ले करू लागला बहुतेक सुखासाठी निसर्गाचा नाश होऊ लागला जमीन कसण्यासाठी लोकसंख्या वाढीमुळे ज्या निसर्गात लक्षात माणूस देव पाहत होता. त्याच देवावर कुऱ्हाड चालवू लागले. जंगलावर चाललेली अर्थव्यवस्था मोडकळीस येऊ लागली तर कंद, सीताफळ, रामफळ, पेरू डिंक या फळांवर रोजगार उपलब्ध एवढेच काय लिंबापासून लिंबोळ्या विकल्या जायच्या व त्यावर उदरनिर्वाह होत असे. माणसाचा गरजा मर्यादित होत्या त्या सर्व हळूहळू अर्थव्यवस्था मोडकळीस झाली. ज्या जंगलात आम्ही राहिलो हे सर्व डोळ्यासमोर उजाड होताना पाहत होतो. जमिनी मध्ये पाणी मुरवल्या जायचे ती हळूहळू कमी झाली नदीच्या नाली झाली नदीकाठी जांभळा सारखी वृक्षाची लागवड असायची लोक जांभुळ विकून उदरनिर्वाह करायची. पण सर्वजण गुण्यागोविंदाने राहत होते.

मी साधारणतः आठवीत असताना आंबेवडगावला म्हणजे साधारण दहा ते बारा किलोमीटर प्रवास पायी करायचं त्यावेळी डोंगर असायची शेतात ओढे त्या ठिकाणी पाणी एप्रिल पर्यंत राहायची नदीला पाणी पिण्यासाठी झरे असायचे एकदा मोठा पाऊस झाला शाळेतून येताना शेतातील वड्यातून पाणी आले मी वाहून चाललो पण शेजारीच मला एका निरगुडीचे झाड दिसले मी त्या झाडावर छापावलो त्या झाडाला विळखा घातला केवळ त्या झाडामुळे वाचलो बाहेर आलो फार समजत नव्हती पण फक्त कळत होते तेव्हाच २६ जानेवारी आपल्याला वाचवली त्याच वृक्षात देव मानायचे व त्यावेळी




पासून वृक्षात देव पाहु लागलो आज साठ वर्षे होत आहेत तेव्हापासून दररोज एक तरी वृक्ष ला पाणी घालतो व त्याचीच पूजा करतो व पूर्ण आपले पुढील आयुष्य वृक्षांसाठीच समर्पित करण्याचा निर्धार केला वृक्षतोड थांबवण्याचा प्रयत्न करू लागलो.

बारावी झाल्यानंतर अंबाजोगाईला योगेश्वरी मध्ये प्रवेश घेतला त्याचवेळी एनसीसी मध्ये प्रवेश घेतला त्या काळात विशिष्ट व देश सेवा यांचा संस्कार होत होता मी गावाकडे जायचो त्यावेळी आमचा मित्र फॉरेस्ट मध्ये होता. त्याच्याबरोबरच आम्ही जंगलात जायचं त्या जंगलातच गवतावर झोपायचं रात्र रात्र जंगलाचे रक्षण करायचं. साधारण ८० ते ९० च्या सुमारास रान डोंगर उजाड झाली होती जी काही लोकसर्पणासाठी झाड तोडायची ती आम्ही रोखायचं एनसीसीच्या युनिफॉर्म फॉरेस्ट सारखाच दिसायचा मी तो युनिफॉर्म अंगावर घालायचं व जंगलात झाड तोडतात त्यांना रोखायचं असा नित्यक्रम चालू होता त्याच काळात जंगलात फॉरेस्ट च्या वतीने वृक्षारोपण करत असत आम्ही त्या मित्रासोबत झाड लावायला जायचं त्याच्या संग पण करायचं व पंधरा पंधरा दिवस त्यांचा कार्यक्रम असे आम्ही झाड लावी त्यास माती लावणे चर खोदणे सर्व त्या मित्रांसोबत करत असू आम्ही निसर्गाशी ना तोडली नाही प्रयत्न करत होतो काही प्रमाणात यश येत होते परंतु त्याच काळात पर्यावरणाचा ऱ्हास करण्यासाठी भांडवलदार प्रयत्न करत होते त्यामुळे हळूहळू निसर्गामध्ये बदल दिसत होते पुढील १९९० मध्ये योगेश्वरी मध्येच नोकरी लागली व १९९० मध्येच मी जग ग्राउंड वर मी विद्यार्थी असताना रक्त व घाम गाळला त्या संकल्पना मिळाला गरजू तरुणांची फळी महाविद्यालयात असताना मला मिळाली. मला ज्या सबनीस सरांनी एनसीसी दिली. त्याच वेळी त्यांनी सांगितले या खुर्ची फक्त मिळवण्यासाठी वापरू नका तर राष्ट्राच्या कल्याणासाठी वापरा युनिफॉर्म अंगावर आला. वडिलांची इच्छा मी संरक्षण दलात जावे नियतिच्या मनात वेगळेच होते. माझ्या अंगावर युनिफॉर्मचा आला पण विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वावर आकार देणे स्वामीजी म्हणायचे योगेश्वरी मधील विद्यार्थी हा संस्कारित करून राष्ट्राप्रती समर्पित भावनेने काम करणारा असावा तसाच मंत्र मनामध्ये घेतला संक ासून आपण देशासाठी काम करायचे. देशाने मला काय दिले यापेक्षा मी देशाला काय दिले हा विचार केल्या व देह आणि देव यांच्यामध्ये देश लागतो. त्याची सेवा हीच ईश्वर सेवा व धैर्य ऊराशी बाळगून काम करू लागलो. एनसीसी ही सैन्य दलाची दुय्यम संघटना आहे तेव्हा या मुलांना म्हणजे प्रत्येक वर्षी एक हजार मुलांना संस्कार व पर्यावरणीय मूल्य रुजवण्याचा प्रयत्न केला कारण कोणतीही मोहीम यशस्वी करण्यासाठी लोक जळजळ होणे गरजेचे आहे तशी वृक्ष लागवड ही लोक चळवळ होण्यासाठी महाराष्ट्रभर वृक्ष लागवडीच्या प्रचार करत महाराष्ट्रभर मोटरसायकलवर मोहीम काढली बीड जिल्ह्यात दोन वेळेस दोनशे गावातून प्रचार मोहीम काढली चर्चासत्र व्याख्याने पथनाट्य कार्यशाळे यांच्या माध्यमातून ५०००० विद्यार्थ्यांच्या हृदयात वृक्षारोपण केले कोणताही पाहुना आला की त्यांच्या हस्ते वृक्षारोपण परिसरात हिरवा करण्याचा छंद लागला परंतु मनावर तसा प्रतिसाद मिळत नव्हता त्याच वेळेस मी २००३ मध्ये योगेश्वरी शिक्षण संस्थेचे नेतृत्व संवेदनशील व वृक्षऋषी डॉक्टर सुरेश खुरसाळे साहेब यांच्याकडे आले. तशी ऑपरेशन ग्रीन आतला गती मिळाली संस्थेचा परिसर ४० एकर चा प्रथम आपल्या परिसराचे नंदनवन करू त्या ठिकाणी वृक्ष विद्यापीठ निर्माण करू त्यासाठी एनसीसी ने पुढाकार घ्यावा युद्ध पातळीवर मोहीम सुरू झाली ही मोहीम यशस्वी करण्यासाठी काय करावे हा विचार चालू असतानाच वाचण्यात आली की मध्य प्रदेशामधील एक अशिक्षित महिलेने ज्यावेळी तिला कळायचे भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात एखादा तरुण शहीद झाला की ती तिच्या नावाने वृक्ष लावायची जालियनवाला बाग हत्या करण्यात आली त्यावेळी १००० भारतीय शहीद झाले असताना आता ही वृक्ष कशी लावायची परंतु ती एकटी हे काम करत होती पुढे गावाचा लक्षात आले व गाव सहभागी झाले हे वाचण्यात आली व त्याचवेळी पर्यावरणातून राष्ट्रभक्ती या उपक्रमाचा जन्म झाला की आपणही झाडांना शहिदांची नावे द्यावी व पुढे सुरू झाले ऑपरेशन ग्रीन अर्थ परिसर निवडला संस्थेचा ४० एकर अत्यंत खडका ठिकाण मारांत दगड उडायचा पण ऑपरेशन म्हटल्यावर मागे हटणे नाही प्रत्येक वर्षी ५ जून या दिवशी हे ऑपरेशन सुरू व्हायची एनसीसी जी विद्यार्थी खड्डे खोदताना घाम रक्त गाळायची ही मुले एवढे प्रेरित व्हायची त्यांची पर्वा न करता आपल्या घामाची अर्घ्य पृथ्वीला द्यायची भूमातेला दान देण्याचे व शरीरांचे नावे वृक्ष लागवड सुरू झाली जाईल तिथे वृक्ष मग ती शाळा गाव मोकळी जागा स्मशानभूमी शेतावर बांधावर वृक्ष लागवड सुरू झाली हळूहळू ही लोक चळवळीचे रूप प्राप्त झाले गव्हातील विद्यालयातील चौथा चालक विद्यार्थी त्यांचा सांभाळ करू लागले संस्थेने कधी मजूर लावून तर कधी ठिबक सिंचन या ४० एकर मध्ये जवळपास सहा हजार वृक्ष लागवड केली ती सर्व वृक्ष लोकसहभागातून विद्यार्थ्यांचे श्रमाने परिसरात उभी राहिली डॉक्टर साहेब गडाचे डॉक्टर परंतु त्यांनी वृक्ष शस्त्रक्रिया केली त्या झाडाला जीवदान मध्ये आज ४० एकर मध्ये शहीद ऑक्सिजन पार्क उभे राहिले त्यामध्ये १२५ विविध जातीची वृक्ष व ६००० वृक्ष त्यांनी आज विद्यापीठ आहे विविध प्रयोग केले एकाच खड्ड्यात दोन किंवा तीन वृक्ष लावायची आज आपण ती एकमेकांना जगण्याचा आधार देतात आज हेच वृक्ष एकात्मतेचा संदेश देतात पक्षाचीच नाही तर पक्षाची शाळा पक्ष्यांचा अधिवास या ४२ एकर मध्ये आहे मोठे तीन तलाव व लहान दोन तलाव ४० एकर मध्ये बोर पुनर्भरण पक्षांना पाणी दिल्याने चाळीस एकर मध्ये पावसाचा पडणारा प्रत्येक थेंब अडवला मरवला जातो त्यामुळे परिसरातील जवळपास २०० बोर्ड चे पाणी वाढले आहे व त्याचाही पाण्याचा प्रश्न ज्या ठिकाणी एक महिन्यात चाळीस हजार चे पाणी लागायचे ते २००३ मध्ये लागायचे आज त्याच परिसरातील दोनशे कुटुंब दहा हजार विद्यार्थी सहा हजार वृक्ष जगवतात याचा परिणाम एनसीसीचा प्रत्येक विद्यार्थी आपल्या शेतात शाळेमध्येही वृक्ष लावून लागला व जवळपास तीन वर्षे त्याच्यावर पर्यावरणीय मूल्य रुग्णालयाचे व ती आज ३५ हजार विद्यार्थी पूर्ण महाराष्ट्रभर वृक्ष लागवड ही चळवळ राबवतात आज तीव्रक्षमित्र म्हणून काम करतात १९९० मधील विद्यार्थी आज त्यांचाही मुलांना एनसीसी मध्ये दाखल करतात व हे वृक्ष आम्ही लावली आहेत हे सांगतात

४० एकर मध्ये उभी राहिली शहीद स्मृती देवराई या बियाणे देशभरातील सैन्य अधिकारी सैनिक यांनी अभिमानाने वृक्ष लावली आहेत हे वृक्ष धनुष्य हे लोक सहभागाचे आज जवळपास परिसरात ५० हजार किलो ऑक्सिजन पक्षी किडे मुंग्या वारूळ गांडूळ खत प्रकल्प लहान मोठी सुविधांची नावे पंधरा ऑक्सिजन पार्क दोन कोटी लिटर पाणी प्रत्येक पावसाळ्यात साठवले जाते येणारा विद्यार्थी वृक्षा खाली बसून अभ्यास करतो चर्चासत्र करतात निसर्गाच्या सानिध्यात आल्याचा भास होतो आजही ४० एकर जमिनीत शहिदांच्या नावे वृक्ष लावली पूर्वी एखाद्या देवाच्या नावाने जंगल शहिदांच्या राखले जायचे आज तेच जंगल शहिदांच्या नावाने देवराई उभी करण्यात आली यात आम्ही यशस्वी झालो पुढे संस्थेची दुरासमवेदनशील मनाचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांच्याकडे आली त्यांनी त्यात भर घालून निसर्ग संवर्धन मंडळ स्थापन करून जवळपास दोन हजार वृक्ष लागवड केली व दहा हजार बियांचे रोपण केली तिला मूर्त रूप देण्याचा प्रयत्न त्यांनी केला त्यामुळे आज पूर्ण विभागात वृक्ष लागवड ही मोहीम सुरू झाली आहे हजारो कोटी रुपयांची मध्यवर्ती जागा पण संस्थेतही त्या ठिकाणी देवराई उभा केली त्याचा आदर्श घेत हजारो मुले सैन्य दलात भरती होत आहे एवढेच नव्हे तर त्या ४० एकर परिसर पूर्ण राष्ट्रभक्तीच्या वातावरणात दुमदुमून गेला आहे.

**मेजर एस.पी.कुलकर्णी,अंबाजोगाई**

## विद्यानिकेतनच्या अर्णव वाघमारेची नवोदय साठी निवड

केज :- तालुक्यातील विडा येथील इंग्रजी माध्यमाच्या विद्यानिकेतन विद्यालयाचा विद्यार्थी अर्णव दीपक वाघमारे याची पुढील शिक्षणासाठी गढी येथील नवोदय विद्यालयात निवड झाली आहे. नवोदय निवड परीक्षेत त्याने ९५.५० टक्के गुण प्राप्त केले. याच शाळेतील गायत्री गणेश पटाईत, कबीर बाबासाहेब वाघमारे, श्रवण श्रीकांत देशमुख, आदि विद्यार्थ्यांनी या परीक्षेत चांगले गुण प्राप्त केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेचे सचिव सतीश कुलकर्णी, मुख्याध्यापिका अंजुषा कुलकर्णी, शिक्षिका प्रणवी देशमुख, दीक्षा वाघमारे, प्रांजली पटाईत, रोहित काळे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## केज पोलिस ठाण्यात रोजा इफ्तार पार्टी संपन्न



केज :- केज पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी मुस्लिम बांधवांच्यासाठी रोजा इफ्तार पार्टी आयोजित केली होती.

दि. १९ मार्च रोजी केज पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पॉलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी मुस्लिम बांधवांच्यासाठी पवित्र अशा रमजान महिन्यातील रोजाच्या कडक उपवासनिमित्त पोलिस ठाण्यात रोजा इफ्तार पार्टी आयोजित केली होती. या कार्यक्रमाला केजच्या नगराध्यक्षा सीताताई बनसोड, गटनेते हारुनभाई इनामदार यांच्यासह सहाय्यक पोलिस निरीक्षक महेश क्षीरसागर, सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे, पोलिस उपनिरीक्षक राकेश बनसोडे, पोलिस उपनिरीक्षक उमेश निकम, पोलिस उपनिरीक्षक लक्ष्मण कीर्तने, पोलिस उपनिरीक्षक अमिरोद्दीन इनामदार, पोलिस उपनिरीक्षक बाळासाहेब रोडे, पोलिस उपनिरीक्षक दत्तात्रय बिक्कड, पत्रकार, प्रतिष्ठित नागरिक आणि सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठित यांच्यासह पोलिस अधिकारी व कर्मचारी उपस्थिती होते.

## सिंचनातील भ्रष्टाचार...पान १ वरून

राहिल्याने शेतीचा विकास झाला नाही आणि शेतकरी कर्जबाजारी होत गेला. इस्रायलसारख्या देशाचे उदाहरण देताना त्यांनी सांगितले की, तिथे खारे पाणी गोड करून शेती केली जाते, मात्र भारतात मुबलक पाणी असूनही नियोजनाच्या अभावामुळे आणि भ्रष्ट व्यवस्थेमुळे शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडला आहे. १९ मार्च १९८६ रोजी साहेबराव करपे यांनी केलेल्या पहिल्या शेतकरी आत्महत्येपासून सुरू झालेला हा प्रवास अद्याप थांबत नसल्याबद्दल त्यांनी तीव्र चिंता व्यक्त केली.

पुरस्काराला उत्तर देताना माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी राज्यातील शेतकऱ्यांच्या विखुरलेल्या शक्तीवर बोट ठेवले. बीड जिल्ह्यात सध्या जातीपातीचा वणवा पेटलेला असताना शेतकऱ्यांच्या दुःखासाठी लोक एकत्र येतात, ही समाधानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, शेतकरी आज जात आणि धर्माच्या राजकारणात विभागला गेल्याने मूळ प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. ज्यांच्यासाठी आपण लढे उभारतो, त्या आंदोलनांमध्ये प्रत्यक्ष लाभार्थ्यांचा सहभाग १० टक्केही नसतो, ही वस्तुस्थिती अस्वस्थ करणारी आहे.

राज्यातील शेतकरी जर आपल्या हक्कांसाठी संघटित झाले, तर सरकार हलवण्याची ताकद त्यांच्यात आहे, असे आवाहन त्यांनी केले. धार्मिक कार्यक्रमांना होणारी गर्दी शेतकरी प्रश्नांच्या आंदोलनात का दिसत नाही, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुदर्शन रापतवार यांनी केले. त्यांनी गेल्या ११ वर्षांपासून सुरू असलेल्या अन्नत्याग आंदोलनाची पार्श्वभूमी विशद करताना सांगितले की, राज्यात शेतीवर अवलंबून असलेल्यांची संख्या घटत असली तरी आत्महत्यांचे प्रमाण मात्र दुप्पट झाले आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने दहा शेतकरी विधवा महिलांचा साडी-चोळी देऊन सन्मान करण्यात आला, जे उपस्थितांच्या हृदयाला भिडणारे होते. शेतकरी संघटनेचे नेते कालिदास आपेट यांनी उपस्थितांचे आभार मानले आणि संघटनेच्या माध्यमातून सुरू असलेल्या कामाचा आढावा घेतला.

या सोहळ्याला बीड जिल्ह्यातील आष्टी, पाटोदा, माजलगाव, गेवराई, धारूर, वडवणी, परळी आणि अंबाजोगाई तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अच्युत गंगणे, वसंत मोरे, इस्माईल शेख, अनिकेत डिघोळकर, शरद लंगे यांच्यासह किसान पुत्र आणि शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रमेश सोनवळकर यांनी केले. सिंचनातील भ्रष्टाचार आणि शेतकऱ्यांची विखुरलेली ताकद या दोन महत्त्वाच्या मुद्द्यांवर या सोहळ्यात सविस्तर मंथन करण्यात आले.

## सैन्य दलातून हनुमंत चौरे निवृत्त; जिवाचीवाडीत गावकऱ्यांतर्फे मिरवणूक व नागरी सत्कार

केज - जिवाचीवाडी (ता.केज) येथील हनुमंत काशिनाथ चौरे हे बॉम्बे इंजिनियरींग बटालियन (११३) या सैन्य दलातून २६ वर्षाची देशसेवा करून २८ फेब्रुवारी रोजी सेवानिवृत्त झाले. गुढी पाडव्याचे औचित्य साधून गावकऱ्यांतर्फे गावातून मिरवणूक व नागरी सत्कार करून त्यांच्या देशसेवेचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाला भाजपचे सामाजिक कार्यकर्ते भागवत चौरे, दीपक काळे, सत्यनारायण चौरे यांची प्रमुख उपस्थिती होती. सैन्य दलात हनुमंत चौरे यांनी बॉम्बे इंजिनियरींग बटालियनमध्ये (११३) २६ वर्षाच्या त्यांच्या देशसेवेचे कार्य तरूण वर्ग आणि तरूणींना भविष्यात नक्कीच प्रेरणा देईल. देशसेवा करताना कुटुंब, सण-वार, सुख-दुःख बाजूला ठेवून कडाक्याची थंडी असो, भीषण उष्णता असो सीमेवर अतूट पहारा देत त्यांच्या या त्यागामुळे भारतीय नागरिक घरांमध्ये शांततेत झोपू शकतो. सैन्यातील शिस्त, निष्ठा आणि ध्येयवाद शिकायला मिळतो. आता सैन्याबाहेरील आयुष्यात ही तुम्ही समाजाला प्रेरणा देत राहाल, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. कार्यक्रमाला गावातील व परिसरातील तरूण, ज्येष्ठ नागरिक, महिला उपस्थित होत्या.

हे पत्रक संपादक, मुद्रक, मालक व प्रकाशक अभिजीत नानासाहेब जगताप यांनी योगेश्वरी मुद्रणालय, अंबाजोगाई येथे छापून दैनिक विवेक सिंधु कार्यालय, नगर परिषद व्यापारी संकुल (संकुल क्र.४३,४४) अंबाजोगाई पिन-४३१५१७ जि.बीड (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले आहे. संस्थापक संपादक - प्रा.नानासाहेब गाठाळ ✻ संपादक- अभिजीत जगताप ✻ वृत्तपत्राचा नोंदणी क्र.६५७८८/८५ ✻ फोन-२४७२७०, मो :-९७६४०३३१११,९७६५५०००८८

## जाहिरनामा

क्रं.२०२४/संकीर्ण/जन्म-मृत्यू नोंदणी/कावि-
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, अंबाजोगाई
दिनांक -११/०२/२०२६

**जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत**

**जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये**

सर्व जनतेस तालुका अंबाजोगाई ता.अंबाजोगाई यांना जाहिर केले जाते की, **अर्जदार श्रीमती. रानी बेगम हबीब रईस अंबाजोगाई ता.अंबाजोगाई जि.बीड** यांचा **जन्म नोंद दिनांक -२४/०६/१९८६** रोजी त्यांचे राहते घरी` अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि.बीड येथे जन्म झाला अर्जदारांनी जन्म कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता अर्जदार यांचे कायदेशीर **जन्माची** दिनांक **२४/०६/१९८६** कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे **जन्म** नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**आदेशावरून**
**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, अंबाजोगाई**

## जाहिर प्रगटन

आशा नामदेव जुने यांनी अंबाजोगाई तालुक्यातील मौजे पुस येथील जमिन सर्व्हे/गट नंबर ११७ मधील ५० आर जमीनीचा ठराव केला असून यांचे सामाईक क्षेत्र आहेत. त्या जमीनीच्या चतुःसिमा खालील प्रमाणे आहेत.

**पुर्वेस** – पुस-जवळगाव रोड
**पश्चिमेस** – पवार यांची जमीन
**दक्षिणेस** – कटारे व पवार यांची जमीन
**उत्तरेस** – अंतर्गत रस्ता

**या दोघांचे सामाईक क्षेत्र १) बालासाहेब प्रभु डापकर रा.पट्टीवडगाव ता.अंबाजोगाई जि.बीड, २) राहुल युवराज देशमुख रा.पुस ता. अंबाजोगाई जि.बीड यांच्याकडुन कायम खरेदी करण्याचा ठराव केला असून सदरील मौजे पुस येथील जमीन गट/सर्व्हे नंबर ११७ मधील ५० गुंठे जमीनीच्या संबंधी कोणाचाही कसलाही हितसंबंध व इतर प्रकारचे हक्क, संबंध असतील तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत आवश्यक त्या मुळ कागदपत्र व पुराव्यासह माझ्याकडे येवून रितसर उजरदारी दाखल करावी. अन्यथा मुदतीनंतर मी सदरील शेत जमीन खरेदीचा व्यवहार पुर्ण करील व त्यानंतर आलेल्या उजरदारीचा विचार होणार नाही. याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.**

**करिता हे प्रगटन प्रसिद्धीस दिले जात आहे.**
**जाहिर प्रगटन देणार**
**स्वाक्षरीत/-**
**आशा नामदेव जुने, रा.अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि.बीड**
**मो : ९५५२१९९३३३/९२७०७३८५९०**

## पालीतील पीएम ...पान ४ वरून

या कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकत्र येत सण साजरा केल्याने परिसरात आनंददायी व सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाला शालेय समिती अध्यक्षा रोहिणी ताई येवले, सदस्य गीता ताई राऊत, अनिताताई वीर, तसेच शेख सलीम भाई, असकर भाई, शेख रजुद्दीन, शेख अन्सार आदी उपस्थित होते.मुख्याध्यापक लाड सर यांच्या मार्गदर्शनाखाली काब्दे मॅडम, पायके सर, राठोड सर, तळेकर सर, डोंगर सर, आघाव सर, सोळुंके सर, साबळे साहेब, मुंडे मॅडम, म्हेत्रे सर, खाडे सर, जाधव सर, सोनवणे मॅडम, हंगे मॅडम, जगताप मॅडम, मुळे मॅडम व सांगळे मॅडम यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

## गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर... पान ४ वरून

खते, पीक फेरपालट, आच्छादन पद्धती (मल्चिंग) आणि जैवखते यांचा समतोल वापर करून मृदा सुपोषण कसे सुनिश्चित करता येईल, याबाबत त्यांनी शास्त्रीय माहिती दिली.

तसेच त्यांनी कृषि विज्ञान केंद्राच्या माध्यमातून वर्षभर राबविण्यात येणाऱ्या भूमी सुपोषणाशी संबंधित उपक्रमांची माहिती देत मृदा परीक्षण, प्रात्यक्षिके, प्रशिक्षण कार्यक्रम आणि सल्ला सेवा यांचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमादरम्यान १४ लक्ष्मी-नारायण जोडप्यांच्या हस्ते विधीपूर्वक मृदा पूजन करण्यात आले. पारंपरिक पद्धतीने गोपूजन करून गायीला पुरणपोळी नैवेद्य खाऊ घालण्यात आला, ज्यातून निसर्ग, भूमी आणि पशुधनाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

भूमी सुपोषणासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या शेतकरी दाम्पत्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी शेतीनिष्ठ पुरस्कार विजेते शेतकरी रवींद्र देवरवाडे यांचा विशेष गौरव करण्यात आला. तसेच देवळा-सरसा श्रमिक शेतकरी गटाने कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून पूजन व उपक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

या प्रसंगी भूमी सुपोषण व बायोडायनॅमिक कॅलेंडर या विषयावरील माहितीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमास कृषि विज्ञान केंद्रातील सर्व शास्त्रज्ञ व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.

गुढीपाडव्याच्या पवित्र दिवशी आयोजित या उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये मृदा आरोग्य संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण होऊन नववर्षाची सुरुवात शाश्वत शेतीच्या संकल्पाने करण्याचा सकारात्मक संदेश देण्यात आला.

## जाहीर प्रगटन

तमाम लोकास वित्त संस्थास, पतसंस्थास, बँकास या जाहिर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, शहर व कसबे अंबाजोगाई जि. बीड येथील जमीन सर्व्हे नंबर ४३६/२ मधील प्लॉट क्र. १८ क्षेत्रफळ पुर्व पश्चिम (दक्षिण बाजु) १६ मीटर, पुर्व पश्चिम (उत्तर बाजु) ११.८० मीटर व दक्षिण उत्तर १५ मीटर आहे. ज्याचे एकुण क्षेत्रफळ २०८.०५ चौ. मीटर चे मुळ खरेदीखत २४५३/२००३ दि. ०७/११/२००३ येणेप्रमाणे वरील चर्तुः सीमेच्या आतील २०८.०५ चौ. मी. चे मुळ खरेदीखत २४५३/२००३ दि. ०७/११/२००३ रोजी अनिल बन्सीलाल सोनी रा. अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड यांनी विकत घेतलेली असुन हे खरेदीखत दुय्यम निबंधक अंबाजोगाई येथे नोंदविण्यात आले आहेत. सदरील प्लॉटचे खरेदी खताचे मुळ प्रत गहाळ झालेली असुन सदरील गहाळ नोंदणीकृत खरेदीखत दस्त अनुक्रमांक २४५३/२००३ दि. ०७/११/२००३ हे कोणत्याही बँकेत अथवा वित्तीय संस्थेत गहाण ठेवुन कर्ज घेतले असल्यास अगर इतर कोणत्याही न्यायालयात वाद चालु असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत खालील पत्यावर अथवा समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांच्या नक्कलेसह आमच्या कार्यालयात येवुन आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हारकत न आल्यास त्यांनी त्यांचे काही एक हितसंबंध आहेत ते त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत असे समजण्यात येईल. नंतर येणा-या कोणच्याही कर्ज, बोजाची अथवा इतर कुठलाही हक्क, हितसंबंधाची कसली ही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

दि.१८/०३/२०२६

**जाहिर प्रगटन देणार**
**स्वाक्षरीत/-**
**ॲड.संतोष कन्नडकर**
**अंबाजोगाई जि.बीड**

## डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर... पान १ वरून

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या साहित्याचा आणि समाजकार्याचा अभ्यास आणी संशोधन या प्रकल्प माध्यमातून करण्यात येणार आहे. 'इंडियन कॉन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च' यांच्यावतीने डिसेंबर २०२५ मध्ये मेजर / मायनर रसिर्च प्रोजेक्टसाठी प्रस्ताव मागविण्यात आले. 'मायनर रिसर्च प्रोजेक्ट'साठी डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी प्रस्ताव सादर केला. 'आयसीएसएसआर'च्या वतीने १५ मार्च रोजी प्रकल्प मंजूरीची यादी जाहिर करण्यात आली आहे. डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी सादर केलेला स्वातंत्र्यवीर सावरकर : ए लिटरारी लिमिनरी ॲंड टायटन ऑफ द सोशल रिफॉर्म्स हा प्रकल्प मंजूर करण्यात आला. या प्रकल्पाचा कालावधी १ वर्षाचा असून यामध्ये ६ लाखांचा निधी मिळणार आहे. डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर हे सावरकर साहित्याचे अभ्यासक असून त्यांनी आजपर्यंत मागील २५ वर्षात स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे जीवन कार्य, साहित्य, सामाजिक कार्य, राजकीय प्रवास,भाषाशुद्धी लिपी सुधारणा, वैज्ञानिक दृष्टिकोन, या विषयावर एक हजारापेक्षा जास्त व्याख्याने महाराष्ट्र आणि महाराष्ट्राच्या बाहेर दिलेली आहेत. 'हर घर सावरकर' उपक्रमातही ते सक्रिय सहभागी आहेत. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवन कार्य आणि साहित्याचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी ते गेले अनेक वर्षापासून सक्रिय आहेत. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या साहित्याचे सुसज्ज असे ग्रंथालय त्यांनी निवासस्थानी निर्माण केले आहे. सावरकर कार्यातील योगदानाबद्दल नामांकित संस्थांनी गौरव केलेला आहे. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे,कोषाध्यक्ष सत्यनारायण लोहिया, विद्यासभेचे उपाध्यक्ष उमेश जगताप, सावरकर संकुलाचे अध्यक्ष डॉ.पि.के. कुलकर्णी, कार्यवाह डॉ. अविनाश देशपांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुहास मोराळे, सर्व प्राध्यापक कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## बलात्काराची पाठराखण... पान १ वरून

शिव शाहू फुले आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात तथाकथित भोंदू तांत्रिक अशोक खरात याचे काळे कारणामे महाराष्ट्रासमोर उघड झाले आहेत. आणखी होत आहेत. विद्यमान काळात ही राजाश्रयाने महिलांचे अश्लाघ्य शोषण सुरू असणे ही शरमेने मान खाली घालायला लावणारे आहे. अघोरी कृत्य व महिलांचे शोषण करणारा हा भोंदू जरी गजाआड गेला असला तरी यावर छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन सत्तेत असलेल्या मंडळींनी गंभीर दखल घेऊन अशा समाजद्रोही, स्त्रीविरोधी प्रवृत्तीला ठेचून काढून एक शिरस्ता कायम करावा. सोबतच राज्य महिला आयोगाच्या खुर्चीवर विराजमान असणाऱ्या रूपालीबाई चाकणकर या भोंदू बाबाच्या ट्रस्टच्या सदस्या तसेच पाठीराख्या असल्याचे समाज माध्यमांमधून समोर येत आहे. याची निश्पक्षपाती पद्धतीने चौकशी करून रुपाली चाकणकर याचा तात्काळ राजीनामा घ्यावा व निष्पक्षपाती चौकशी पूर्ण करून दोषींवर कठोर कारवाई करावी यासाठी जनवादी महिला संघटना व बीड मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाकडून शुक्रवार दि २० रोजी धारूर तहसील समोर निदर्शने करण्यात आली. या प्रसंगी पक्षाचे जिल्हा सचिव कॉ.ऑड. अजय बुरांडे यांच्यासह कॉ.अशोक थोरात, जनवादी महिला संघटनेच्या कॉ. मीराताई शिंदे, काशीराम सिरसाट, संजय चोले, कॉ.लता खोपकर, दादासाहेब सिरसाट, बालासाहेब चोले, धनविर तांबोरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

**नगर परिषद,अंबाजोगाई जि.बीड**

## जाहिरनामा

२४८/१८ २०२६ १५७२ दि.२०/०३/२०२६

अर्जदारांचे नांव : **मंजू नरहरी तपकीरे** विक्री किंवा नावे करून देणाऱ्याचे नांवः **सिंधुबाई बालासाहेब बोराडे** प्रकरण : नांव नोंदणी बाबत घर नं.९-**५९२ सर्वे नं.३६४/२**
**क्षेत्रफळ - १९५.१६ चौ.मी.**

सर्व जनतेस जाहिर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर **नोंदणीकृत खरेदीखताचे** अधारे या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणे बाबत अर्ज दिला आहे. ज्या चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

या बाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिद्ध केल्यापासून मालकीहक्काच्या लेखी पुराव्यासह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

**चतु : सिमा**
पुर्व : **प्लॉट क्र.२० चा भाग**,पश्चिम : **प्लॉट क्र.१९**, दक्षिण : **सर्वे नं.३७१ मधील जमीन**
उत्तर : **९ मी रू.रस्ता**

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबाजोगाई**

**नगर परिषद,अंबाजोगाई जि.बीड**

## जाहिरनामा

७०/१८ २०२६ १५७४ दि.२०/०३/२०२६

अर्जदारांचे नांव : **आयोध्या लक्ष्मण बडे** विक्री किंवा नावे करून देणाऱ्याचे नांवः **रमेश दिगांबर देशपांडे व इतर, २) सागर रमेश देशपांडे, ३) प्रमोदीनी रमेश देशपांडे** प्रकरण : नांव नोंदणी बाबत घर नं.
**क्षेत्रफळ - २२५.०० चौ.मी.**

सर्व जनतेस जाहिर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर **नोंदणीकृत खरेदीखता व वारस पत्र आधारे** या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणे बाबत अर्ज दिला आहे. ज्या चतुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

या बाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिद्ध केल्यापासून मालकीहक्काच्या लेखी पुराव्यासह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

**चतु : सिमा**
पुर्व : **जिरे प्लॉटींग**,पश्चिम : **अंतर्गत रस्ता**, दक्षिण : **प्लॉट नं.१८**, उत्तर : **प्लॉट नं.१६**

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबाजोगाई**

## तात्काळ राजीनामा... पान १ वरून

त्यानंतर त्यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेत चर्चा केली. रुपाली चाकणकरांचा राजीनामा घेण्यात येत असेल तर त्याचं आम्ही स्वागत करतो. राज्यातल्या महिला नेतृत्व म्हणून सुनेत्रा पवारांनी हा निर्णय घेणं अपेक्षित होतं, पण त्यांच्याकडून हा निर्णय झाला नाही याची खंत वाटते अशी प्रतिक्रिया सुषमा अंधारे यांनी दिली.रुपाली चाकणकरांची प्रथमदर्शनी या गुन्ह्यामध्ये सहभाग असल्याचा संशय असून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला पाहिजे आणि त्यांची नार्को टेस्ट करण्यात यावी अशी मागणी सुषमा अंधारे यांनी केली. सामाजिक कार्यामध्ये काम करत असताना आपण खरातांच्या ट्रस्टमध्ये सहभागी होतो. अशोक खरात यांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल आपल्याला काही कल्पना नसल्याचं मत रुपाली चाकणकरांनी व्यक्त केलं होतं.

## नव्या बदलांना ... पान ४ वरून

करतात. काही ठिकाणी पाण्याची आणि ज्ञानाची कमतरता, तर काही ठिकाणी भांडवलाचा अभाव ही मोठी अडचण आहे. या पार्श्वभूमीवर ग्लोबल विकास ट्रस्ट शेतकऱ्यांना एकत्र आणून गट पद्धती विकसित करत आहे. या गटांमुळे केवळ उत्पादनातच वाढ होत नाही, तर दर्जेदार शेती, बाजारपेठेतील योग्य दर आणि सामूहिक निर्णयक्षमतेलाही बळ मिळते. या प्रक्रियेतून शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढत असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी मिळत आहे. अशा बदलांच्या प्रवासात शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत देण्याचा निर्धार मयंक गांधी यांनी व्यक्त केला.

पाण्याचे व्यवस्थापन आणि सामाजिक ऐक्य यांचा अतूट संबंध अधोरेखित करताना पानी फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित भटकळ यांनी महत्त्वपूर्ण मुद्दा मांडला. जिथे मने जोडली जातात तिथेच पाणी थांबते आणि तिथेच खरी समृद्धी निर्माण होते, असे सांगताना त्यांनी गावातील एकोपा, सहभाग आणि सामूहिक श्रम यांचे महत्त्व अधोरेखित केले. एकटा ते ऐकता हे सूत्र केवळ घोषवाक्य नसून ग्रामीण विकासाचा पाया आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. अंबाजोगाई तालुक्यातील मौजे मांडवा पठाण येथे झालेला कार्यक्रम हा या व्यापक विचारांचा प्रत्यक्ष नमुना ठरला. नव्याने केळी लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून आर्थिक व तांत्रिक सहाय्य देण्यात आले. भांडवलाच्या अभावामुळे मागे राहणाऱ्या शेतकऱ्यांना -ण डारश्रश्र ऋळपरपलश इरपज्ञ च्या माध्यमातून कर्जसहाय्य उपलब्ध करून देण्यात आले, तर सिंचनासाठी ३८ शेतकऱ्यांना ठिबक संचांचे वितरण करण्यात आले.

गुढी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर उर्वरित शेतकऱ्यांना मदत देऊन या उपक्रमाला पूर्णता देण्यात आली. मांडवा पठाण येथील हनुमान मंदिरात झालेल्या या कार्यक्रमातून एक स्पष्ट संदेश समोर आला. शाश्वत शेती आणि समृद्ध गावांसाठी केवळ संसाधने नाहीत, तर सामूहिक विचार आणि एकजूट हीच खरी ताकद आहे. या कार्यक्रमास ग्लोबल विकास ट्रस्टचे ट्रस्टी संजय परमार, सरपंच गणेश रुद्राक्ष, सत्यप्रेम नरवणे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. मांडवा पठाण येथील कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून पापनाशी नदीचे खोलीकरण आणि रुंदीकरण करण्यात येत असून त्यामध्ये ऋठ- घेतले जात आहेत. या संपूर्ण कामाची पाहणी करून त्याच्या प्रत्यक्ष स्वरूपाची पाहणी करण्यात आली. तसेच रेवली, मोहा, करेवाडी आणि कान्नापूर येथील प्रगतिशील शेतकऱ्यांच्या शेतांना भेट देत आंबा, डाळिंब, केळी, लिंबू तसेच रेशीम शेतीची प्रत्यक्ष पाहणी सत्यजित भटकळ यांनी केली. विविध पिकांच्या व्यवस्थापन पद्धती, उत्पादनातील गुणवत्ता आणि शेतकऱ्यांनी अवलंबलेल्या नवकल्पनांची त्यांनी माहिती घेतली. या भेटीदरम्यान त्यांच्या समवेत डि. एल. मोहिते आणि संदीप जोशी उपस्थित होते.

## जाहिरनामा

क्रं.२०२६/संकीर्ण/जन्म-मृत्यू नोंदणी/कावि-
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, अंबाजोगाई
दिनांक -२०/०३/२०२६

**जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत**

**जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये**

सर्व जनतेस तालुका अंबाजोगाई ता.अंबाजोगाई यांना जाहिर केले जाते की, **अर्जदार सुरैय्या बेगम बाबु सय्यद रा.भोईगल्ली रविवार पेठ अंबाजोगाई ता.अंबाजोगाई जि.बीड येथील रहिवासी असून** यांचा **जन्म नोंद दिनांक -१६/०५/१९८५** रोजी त्यांचे राहते घरी अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि.बीड येथे जन्म झाला अर्जदारांनी जन्म कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता अर्जदार यांचे कायदेशीर **जन्माची** दिनांक **१६/०५/१९८५** कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे **जन्म** नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**आदेशावरून**
**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, अंबाजोगाई**

## जाहिरनामा

क्रं.२०२६/संकीर्ण/जन्म-मृत्यू नोंदणी/कावि-५५०
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, अंबाजोगाई
दिनांक -२०/०३/२०२६

**जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत**

**जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये**

सर्व जनतेस तालुका अंबाजोगाई ता.अंबाजोगाई यांना जाहिर केले जाते की, **अर्जदार मिलींद माणिक चव्हाण रा.खडकी ता.कळंब जि.धाराशिव यांचा मुलगा नामे मानविक मिलींद चव्हाण** यांचा **जन्म नोंद दिनांक -२४/०१/२०२४** रोजी **स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रूग्णालय अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि.बीड येथे जन्म झाला असून** जन्म कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता अर्जदार यांचे कायदेशीर **जन्माची** दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे **जन्म** नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**आदेशावरून**
**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, अंबाजोगाई**

## केज पोलिसांचे... पान ४ वरून

सहाय्यक पोलिस निरीक्षक महेश क्षीरसागर, सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे, पोलिस उपनिरीक्षक राकेश बनसोडे, पोलिस उपनिरीक्षक उमेश निकम, पोलिस उपनिरीक्षक लक्ष्मण कीर्तने यांच्यासह पोलिस अधिकारी व कर्मचारी उपस्थिती होते.

## मानवी वस्तीत.. पान १ वरून

आता परिस्थितीनुसार तातडीने निर्णय घेऊ शकतील. वनमंत्री गणेश नाईक यांनी स्पष्ट केले की, राज्यात वन्यजीव संवर्धनामुळे बिबट्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे आणि हे बिबट्या आता केवळ जंगलापुरते मर्यादित न राहता उसाच्या शेतात वास्तव्यास असून मानवी वस्त्यांमध्ये पाळीव प्राण्यांची शिकार करत आहेत.

विधानसभेत या विधेयकावर चर्चा करताना विरोधकांनी सरसकट शिकारीची भीती व्यक्त केली होती. विशेषतः आदित्य ठाकरे यांनी या दुरुस्तीमुळे वन्यप्राण्यांच्या शिकारीच्या घटना वाढू शकतात असा संशय व्यक्त केला होता. मात्र, वनमंत्र्यांनी ही भीती फेटाळून लावत स्पष्ट केले की, ही मुभा केवळ मानवी वस्तीत शिरून धोका निर्माण करणाऱ्या बिबट्यांच्या संदर्भात असेल. तसेच शिक्षण, वैज्ञानिक संशोधन आणि जीवरक्षक औषधांच्या निर्मितीसाठी वन्यप्राण्यांचा वापर करण्यासही आता परवानगी मिळाली आहे, मात्र त्यासाठी वन्यप्राण्यांना ठार न मारता किंवा त्यांच्यावर विषप्रयोग न करता प्रक्रिया पार पाडावी लागेल.

## कर्जनी गावात .. पान १ वरून

ही घरे उभारली. मात्र, आता अचानक वन विभागाचे अधिकारी या ठिकाणी दाखल होऊन ही जमीन वन विभागाची असल्याचा दावा करत आहेत. येथील सर्व बांधकामे तात्काळ काढून टाका, अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल, असा सज्जड दम अधिकाऱ्यांकडून दिला जात असल्याचे पीडित ग्रामस्थांचे म्हणणे आहे. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे वर्षानुवर्षे तिथे राहणाऱ्या कुटुंबांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण आहे. या प्रश्नावर शिवसेना जिल्हा संघटक तथा गुजर समाज जिल्हाध्यक्ष रतन गुजर यांनी आक्रमक भूमिका मांडली आहे. त्यांनी प्रसिद्धिस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, ज्या नागरिकांनी धरणासाठी आपल्या जमिनी दिल्या, त्यांच्यावरच आज बेघर होण्याची वेळ आली आहे. जर प्रशासनाने सामोपचाराने प्रश्न न सोडवता घरांवर नांगर फिरवण्याचा प्रयत्न केला, तर तलावाचा सांडवा फोडल्याशिवाय समाज बांधव शांत बसणार नाहीत. हा लढा केवळ घरांचा नसून तो अस्तित्वाचा असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या आंदोलनाच्या इशाऱ्यावेळी गुजर समाज जिल्हा उपाध्यक्ष अशोक घुशीर, जिल्हा संघटक अरुण नाना खटाने, सुनील बहिरवाळ, गजानन बहिरवाळ, राजाभाऊ गुजर, तालुका अध्यक्ष शहादेव डोंगर यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक आणि ग्रामस्थ उपस्थित होते. प्रशासनाने तातडीने या संवेदनशील विषयात लक्ष घालून ग्रामस्थांशी संवाद साधावा आणि त्यांच्या हक्काच्या घरांवरील कारवाई थांबवावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. अन्यथा, बीड जिल्ह्यात एक मोठे जनआंदोलन उभे राहण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

दैनिक
# विवेक सिंधु
शनिवार, दि.२१ मार्च २०२६ पान ४

## डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांना 'रिसर्च प्रोजेक्ट' मंजूर

बीड – येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांना 'आयसीएसएसआर' (शिक्षा मंत्रालय भारत सरकार ) यांच्या वतीने ६ लाखांचा ' रिसर्च प्रोजेक्ट' मंजूर करण्यात आला आहे.

पान ३ वर

## पालीतील पीएम श्री शाळेत इफ्तार पार्टी; राष्ट्रीय एकात्मतेचा सुंदर संदेश

बीड – पाली : मौजे पाली येथील पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत राष्ट्रीय एकात्मतेचा सुंदर संदेश देणारी इफ्तार पार्टी उत्साहात पार पडली. शाळेच्या वतीने शालेय विद्यार्थी व मुस्लिम बांधवांसाठी रोजा इफ्तारचे आयोजन करण्यात आले होते.

पान ३ वर

## केज पोलिसांचे पथसंचलन



केज :– रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर केज पोलिसानी शहरातील मुख्य रस्त्यावरून पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या नेतृत्वात पथसंचलन केले.

दि. १९ मार्च रोजी सायंकाळी ६:०० केज पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी मुस्लिम बांधवांच्या पवित्र अशा रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर केज शहरातील मुख्य रस्त्यावरून पथसंचलन करण्यात आले. पोलिस ठाणे, छत्रपती शिवाजी महाराज चौक, कानडी चौक, बस स्टँड, भवानी चौक, मंगळवार पेठ कॉर्नर, मंगळवार पेठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय, नगर पंचायत, रोजा मोहल्ला, बडी मस्जिद, स्टेट बँक ऑफ इंडिया या प्रमुख मार्गावरून शस्त्रसज्ज पोलिस, दंगल नियंत्रक कमांडोच्या वेशातील पोलिस, गृह रक्षक दलाचे जवान यांनी पथसंचलन केले.

या पथसंचना मध्ये मध्ये पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्यासह

पान ३ वर

## अवकाळी पावसाने बीड जिल्ह्यात हाहाकार

### तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत करा, पंकजा मुंडेंचे प्रशासनाला आदेश

बीड – बीड जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून झालेल्या गारपीट आणि अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले असून या पार्श्वभूमीवर राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी जिल्हा प्रशासनाला तातडीने नुकसानीचे पंचनामे करण्याचे कडक निर्देश दिले आहेत. बाधित शेतकऱ्यांना लवकरात लवकर आर्थिक मदत मिळावी यासाठी शासन स्तरावर सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले आहे. बीड, वडवणी आणि आष्टी यांसह जिल्ह्याच्या विविध



भागात या नैसर्गिक आपत्तीचा मोठा फटका बसला असून शेतातील उभ्या पिकांसह काढणीला आलेल्या धान्याचेही मोठे नुकसान झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जिल्ह्याच्या अनेक भागांत काल आणि परवा जोरदार वारे आणि गारपिटीसह पाऊस झाला. या अवकाळी संकटामुळे आंबा, टरबूज आणि मोसंबी यांसारख्या फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे, तर गहू, हरभरा, ज्वारी आणि कांदा ही पिके देखील पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत. अनेक ठिकाणी मळणीसाठी काढून ठेवलेली पिके पावसात भिजल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत मंत्री पंकजा मुंडे यांनी प्रशासकीय यंत्रणेकडून नुकसानीचा सविस्तर आढावा घेतला आणि एकाही नुकसानग्रस्त शेतकऱ्याचा पंचनामा राहू नये, अशी सक्त ताकीद दिली आहे.

पंकजा मुंडे यांनी जिल्हा प्रशासनाशी संवाद साधताना स्पष्ट केले की, शेतकऱ्यांवर आलेले हे संकट मोठे असून त्यांना आधार देणे ही सरकारची प्राथमिकता आहे. कृषी आणि महसूल विभागाने समन्वयाने काम करून पंचनाम्याची प्रक्रिया युद्धपातळीवर पूर्ण करावी, जेणेकरून मदतीचा प्रस्ताव तातडीने राज्य सरकारकडे सादर करता येईल. अवकाळी पावसामुळे हवालदिल झालेल्या बीड जिल्ह्यातील बळीराजाला दिलासा देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

## गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर भूमी सुपोषण व संरक्षण कार्यक्रम उत्साहात

आंबाजोगाई : दीनदयाल शोध संस्थान कृषि विज्ञान केंद्र, आंबाजोगाई यांच्या वतीने दि. १९ मार्च २०२६ रोजी गुढीपाडवा या शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या सांस्कृतिक सणाच्या शुभमुहूर्तावर देवळा येथे भूमी सुपोषण व संरक्षण कार्यक्रम उत्साहात व शेतकऱ्यांच्या मोठ्या सहभागात पार पडला. नवीन वर्षाच्या प्रारंभी भूमी पूजन व सुपोषणाचा संकल्प करून शाश्वत शेतीकडे वाटचाल करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.



कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. वसंत देशमुख यांनी उपस्थित शेतकऱ्यांना सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी मृदा सुपोषणाचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, शेतीची खरी ताकद ही मातीच्या आरोग्यात आहे. सेंद्रिय खतांचा वापर, शेणखत, कंपोस्ट, गांडुळखत, हिरवळीची

पान ३ वर

## नव्या बदलांना स्विकारणाऱ्या शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करणार : मयंक गांधी

### जिथे मने जोडली जातात तिथेच पाणी थांबते - सत्यजित भटकळ

परळी – ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी केवळ शेतीत बदल करून चालत नाही, तर विचारांत आणि सामूहिक कृतीतही परिवर्तन आवश्यक आहे. याच दृष्टीकोनातून ग्लोबल विकास ट्रस्टकडून माती, शेती आणि मती या त्रिसूत्रीवर आधारित कामाला गती देण्यात येत आहे. आतापर्यंत वैयक्तिक पातळीवर शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यावर भर देण्यात आला होता; मात्र आता गाव पातळीवर एकात्मिक विकास घडवून आणण्याचे मोठे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले आहे. ग्रामीण भागातील वास्तव पाहता, अनेक शेतकरी नव्या तंत्रज्ञानाचा



स्वीकार करण्यास संकोच

पान ३ वर







## आधार उद्योजकता प्रशिक्षण केंद्र यांच्या वतीने केज येथे दोन दिवसीय प्रशिक्षण

केज – केज शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती सभागृह येथे आधार उद्योजकता प्रशिक्षण केंद्र यांच्या वतीने केज येथे दोन दिवसीय प्रशिक्षण घेण्यात आले.

शेळीपालन ,कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय प्रशिक्षण संपन्न,या प्रशिक्षणामध्ये शेळ्यांचे आजार, उपचार लषिकरण,चारा व्यवस्थापन शेड व्यवस्थापन, तसेच शासनाच्या वेगवेगळ्या योजना, त्यासाठी लागणारी कागदपत्रे प्रोजेक्ट रिपोर्ट नमुना शासकीय योजनांची किट अनुभव प्रमाणपत्र, प्रशिक्षण प्रमाणपत्र इत्यादी देण्यात आले यामध्ये आधार उद्योजकता



प्रशिक्षण केंद्राचे मुख्याधिकारी राजेंद्र कांबळे,प्रकल्प अधिकारी निलेश मोटे, डॉ गणेश गवळी, तज्ञ प्रशिक्षक जयंत कांबळीकर आदींची उपस्थिती होती.

पशुसंवर्धन प्रशिक्षणासाठी पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ थळकरी यांनी मार्गदर्शन केले.प्रशिक्षणात तालुकाभरातून शेतकरी,युवक यांनी प्रशिक्षण पूर्ण केले.







## नांदूरघाट येथे सोरट जुगार चालकास पकडले

केज – नांदूरघाट (ता. केज) येथील बाजारतळावर बापु सरदार शिंदे हा सोरट नावाचा जुगार चित्रावर पैसे लावून लोकांकडून खेळवित व खेळत आहे अशी माहिती मिळाल्यावरून सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश क्षीरसागर, जमादार राजू वंजारे, होमगार्ड ढाकणे यांच्या पथकाने १९ मार्च रोजी दुपारी २.४० वाजता छापा मारला. त्यास सोरट नावाचा जुगार स्वतःचे फायद्यासाठी चित्रावर पैसे लावून खेळत व खेळवीत असताना रंगेहाथ पकडले. त्याच्याकडील सोरट जुगाराचे साहित्य, एक हजार ७९० रुपये व चार हजार रुपयांचा मोबाईल जप्त केला. बापू शिंदे विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून फौजदार अशोक सोनवणे तपास करताहेत.